नाटयनिर्मिती संस्थांना, व्यावसायिक (नवीन), संगीत (नवीन संहिता असणारे व जुनी संहिता असणारे नाटक) आणि प्रायोगिक (नवीन), नाटकांच्या नाटय निर्मितीसाठी अनुदान, या योजनेची सुधारीत नियमावली.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्रमांक : नानिअ २०१७/निनिसंअ/प्र. क्र. २१२/सां.का. ४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९

वाचा :-१) शासन निर्णय क्र.सांकासं २००५/प्र.क्र. ३८८/सां.का.३, दिनांक ०२ मार्च २००६
२) शासन निर्णय क्र.सांकासं २००६/प्र.क्र. २५३/सां.का.३ दिनांक ०४ सप्टेंबर २००६
३) शासन निर्णय क्रमांक नानिअ २०१२/प्र.क्र.२५०/सांका.४, दिनांक २८ ऑक्टोबर २०१३
४) शासन निर्णय क्रमांक नानिअ २०१२/प्र.क्र.२५०/सांका.४, दिनांक ०७ सप्टेंबर २०१५
५) शासन निर्णय क्रमांक नानिअ २०१२/प्र.क्र.२५०/सां.का.४, दिनांक १९ जानेवारी, २०१६
६) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. सां.का.सं.२९२६, दिनांक ०६ सप्टेंबर, २०१७.

**प्रस्तावना :-**

मराठी चित्रपट निर्मितीस ज्याप्रमाणे राज्य शासनामार्फत अनुदान देण्यात येते, त्याप्रमाणे नाटय निर्मिती संस्थांना नवीन नाटकांच्या निर्मितीसाठी अनुदान देण्याची योजना उपर्निर्दिष्ट क्र. १ येथील दिनांक ०२ मार्च २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत नवीन नाटयनिर्मितीसाठी अनुदान मंजूर करण्यासाठी नियमावली तयार करण्यासाठी उपर्निर्दिष्ट क्र. २ येथील दिनांक ०४ सप्टेंबर २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती.

२. नाटय निर्मिती संस्थांना नवीन नाटय निर्मितीसाठी अनुदान, या योजनेखाली अनुदान देतांना नाटय संस्थेचा दर्जा विचारात घेऊन अनुदानाचे नियम ठरविण्यात आले होते. तथापि, शासन स्तरावर योजनेचे पुनर्विलोकन करताना असे जाणवले की, नाटकाच्या निर्मितीस अनुदान देतांना नाटकांचा दर्जा विचारात घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या प्रत्येक नाटकाचा विचार न करता केवळ नवीन नाटय संहितेच्या नाटकांचाच विचार करणे आवश्यक आहे. जेणेकरुन नवीन संकल्पना, नवीन विषय नाटय रुपातून सादर करणे आणि नवीन लेखक घडविणे, या प्रक्रियेस खऱ्या अर्थाने चालना मिळेल. अनुदानामधून दर्जेदार नवीन संहितेचे नाटक तयार करण्याच्या प्रक्रियेस प्रोत्साहन देणे अभिप्रेत असल्यामुळे केवळ दर्जेदार नाटकांनाच अनुदान देणे योग्य राहील.

३. हे अनुदान केवळ व्यावसायिक नाटय संस्थांना देणे योग्य नसून व्यावसायिक हेतू न बाळगता चाकोरीबाहेरील नाटय प्रयोग करणाऱ्या प्रायोगिक नाटकांचादेखील या अनुदानासाठी विचार होणे आवश्यक असल्यामुळे योजनेमध्ये सुधारणा करतांना प्रायोगिक नाटकांचा दर्जा पाहून त्यांनाही अनुदान

सांस्कृतिक कार्य संचालनालय
महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक..........
विभाग..........

देणे आवश्यक आहे. या बाबींचा विचार करुन सदर योजनेच्या नियमावलीत उपर्निर्दिष्ट क्र.३ येथील दिनांक २८ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली होती.

४. "नाटय निर्मिती संस्थांना नवीन नाटय निर्मितीसाठी अनुदान" या योजनेचे पूर्वीचे सर्व शासन निर्णय निरसित करुन या योजनेसाठी उपर्निर्दिष्ट क्र. ५ येथील दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत नियमावली तयार करण्यात आली आहे.

५. "नाटय निर्मिती संस्थांना नवीन नाटय निर्मितीसाठी अनुदान" ही योजना राबवितांना दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील दोनही योजना राबविताना नाटयसंस्था तसेच जेष्ठ रंगकर्मींकडून या योजेनेतील नियमावलीमधील काही अटींमध्ये सुधारणा करण्याबाबत वेळोवेळी करण्यात येणारी मागणी विचारात घेता सदर शासन निर्णय अधिक्रमित करुन सुधारीत नियमावली तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

'नाटय निर्मिती संस्थांना नवीन नाटयनिर्मितीसाठी अनुदान' या योजनेचा दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन अधिक्रमित करुन या योजनेसाठी, सुधारीत नियमावली तयार करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २००६ साली "दर्जेदार मराठी नाटय निर्मितीसाठी पॅकेज" ही योजना सुरु करताना "दर्जेदार मराठी नाटयनिर्मितीसाठी पॅकेज" या मथळयाखाली एकूण ५ योजना तयार करण्यात येऊन, त्यामधील एक भाग म्हणून "नाटय निर्मिती संस्थांना नवीन नाटय निर्मितीसाठी अनुदान देण्याची योजना" कार्यान्वित करण्यात आली होती. दर्जेदार नाटय निर्मिती करणे हे सदर पॅकेज घोषित करण्याचे मुख्य प्रयोजन होते. ही बाब विचारात घेऊन नाटय संस्थेचा दर्जा ठरविण्याऐवजी नाटकांचा दर्जा ठरवून त्या नवीन नाटकांना अनुदानासाठी पात्र किंवा अपात्र ठरविण्यात यावे.

३. या शासन निर्णयाच्या दिनांकापासून नवीन नियमावलीनुसार नाटय निर्मितीसाठी अनुदान देण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.

४. नवीन नियमावलीनुसार व्यावसायिक नाटकांच्या सादरीकरणासाठी अनुदान देण्याबरोबरच प्रायोगिक नाटकांनादेखील अनुदान देण्यात येणार असल्यामुळे याप्रकरणी नाटकाच्या प्रकारानुसार खालीलप्रमाणे दोन कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहेत.

**(अ) व्यावसायिक व संगीत नाटय निर्मिती अनुदानासाठीची कार्यपध्दती :**

१) प्रत्येक आर्थिक वर्षात ज्या संस्थेचे नवीन नाटक सादरीकरणासाठी तयार होईल, त्या संस्थेने अनुदानासाठीचा अर्ज संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे सादर करावा. अर्ज सादर करतांना खालील अटींची पूर्तता करावी आणि अनुषंगिक कागदपत्रे सोबत जोडण्यात यावी.

(१.१) नाटय संस्थेचे नांव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक

(१.२) नाटय संस्थेच्या स्थापनेचा दिनांक व स्थापनेबाबतचा तपशील

(१.३) ज्या नाटय प्रयोगासाठी संस्था अर्ज करीत आहे त्या नाटकाचे किमान ५ प्रयोग व्यावसायिक स्तरावर अर्ज सादर करण्यापूर्वी झालेले असावेत.

(१.४) ज्या नवीन नाटकासाठी अनुदान हवे आहे, त्या नाटकाचे नांव, लेखकाचे नांव, नाटक रंगमंचावर सादर करण्याबाबतचे लेखकाचे पूर्व परवानगी पत्र.

(१.५) एक नाटय संस्था एका आर्थिक वर्षात **जास्तीत जास्त** दोन नवीन नाटकांसाठीच शासकीय अनुदान मिळविण्याकरीता अर्ज करु शकेल. त्यामुळे नाटयसंस्थेने अर्ज करताना 'सदर अर्ज हा चालु असलेल्या आर्थिक वर्षातील कमाल दोन अर्ज सादर करण्याच्या मर्यादेतच सादर केला असल्याचे' प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

(१.६) एखादे नाटक दोन किंवा अधिक संस्थांनी एकत्र येऊन केले असल्यास (सहयोगाने किंवा प्रकाशित किंवा निर्मिती किंवा सादर) ज्या नाटय संस्थेची निर्मिती आहे, त्याच संस्थेचे नाटक गृहित धरले जाईल. एक संस्था केवळ दोनच नवीन नाटकांसाठी अर्ज करु शकत असल्यामुळे सदर संस्थेने दुसऱ्या नाटय संस्थेसोबत केलेला अर्ज हा या दोन अर्जांच्या मर्यादेतीलच एक अर्ज असल्याचे गृहित धरण्यात येईल.

(१.७) नाटकाची संहिता प्रयोग परिनिरिक्षण मंडळाकडून प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र, जर नाटयसंहितेस तात्पुरत्या स्वरुपाचे प्रमाणपत्र मिळाले असेल व ते तात्पुरते प्रमाणपत्र अनुदानासाठी सादर केले असेल तर सदर नाटक अनुदानासाठी पात्र ठरल्यानंतर नाटकाचे प्रयोग सादर केल्याचे पुरावे देताना कायमस्वरुपी सदर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय प्रत्यक्ष शासकीय अनुदान वितरीत केले जाणार नाही.

(१.८) संगीत नाटकाच्या बाबतीत नवीन नाटयसंहितेची अट असणार नाही. तथापि, नवीन संहिता असणारे संगीत नाटक सादर केल्यास त्यांना जास्त अनुदान देण्यात येईल. 'संगीत नाटक' याचा अर्थ भारतीय पारंपरिक वाद्यांचा प्रत्यक्ष उपयोग करुन अभिजात भारतीय संगीतावर आधारीत पद्यांचा समावेश असलेले संगीत नाटक, असा असेल.

(१.९) व्यावसायिक नाटकाचे निव्वळ सादरीकरण किमान १२० मिनिटे व कमाल १८० मिनिटांचे असणे आवश्यक आहे. तसेच संगीत नाटकाचे सादरीकरण किमान १२० ते कमाल २१० मिनिटांचे असणे आवश्यक आहे.

२) नाटय संस्थांकडून प्राप्त अर्जाच्या कागदपत्रांची संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत छाननी करण्यात येईल आणि नियमाप्रमाणे सर्व कागदपत्रे सादर करणाऱ्या संस्थेचे नाटक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत स्थापित केलेल्या परीक्षण समितीपुढे सादर करण्यात येईल. नाटय संस्थेने अर्ज सादर केल्यानंतर नाटय संस्थेमार्फत परीक्षण समितीपुढे ठरवून दिलेल्या दिनांकास नाटकाचे सादरीकरण केले नाही, तर सदर नाटकाचा शासकीय अनुदानासाठी परत विचार केला जाणार नाही.

३) नाटय संस्थांकडून प्राप्त झालेल्या अर्जातील नाटकाचा दर्जा निश्चित करण्यासाठी किमान १५ ते २० सदस्यांचा समावेश असलेली समिती संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत नियुक्त करण्यात येईल. सदर समिती प्रायोगिक नाटकांचेही परीक्षण करुन दर्जा निश्चित करेल. याकरिता या
विभागाच्या दिनांक २८/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली समिती पुढील आदेश होईपर्यंत कार्यरत राहील. या समितीत नाटय लेखक, दिग्दर्शक, अभिनेते, अभिनेत्री, समीक्षक,

तंत्रज्ञ, नेपथ्यकार, संगीत तज्ञ तसेच बाल नाटय, संगीत नाटय अशा वेगवेगळया नाटय क्षेत्रामधील व्यक्ती यांचा समावेश असेल. नाटकाचे परीक्षण करण्यासाठी किमान ६ समिती सदस्यांची गणसंख्या असणे आवश्यक राहील.

४) परीक्षण समितीच्या सदस्यांना प्रत्येक नाटकासाठी रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त) इतके मानधन अदा करण्यात यावे. परिक्षण समिती सदस्यांना त्यांचा प्रवास खर्च रेल्वेच्या ए.सी.टू टायर प्रवासाच्या दरानुसार मंजूर करण्यात यावा आणि समिती सदस्य यांचे मानधन, प्रवास खर्च, भोजन खर्च व निवासाची व्यवस्था, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत करण्यात येईल.

५) परीक्षण समितीच्या बैठका सोयीनुसार घेण्यात येतील. ज्या ठिकाणी नाटकाचे प्रयोग सुरु असतील, त्याठिकाणी परीक्षकांना नाटकाच्या परीक्षणासाठी आवश्यक तेवढी आसने उपलब्ध करुन देण्याचे बंधन व जबाबदारी संबंधीत नाटय निर्मात्यांची असेल.

६) परीक्षण समितीस नाटकांचे परीक्षण करुन नाटकांचा दर्जा ठरविण्यासाठी एक गुणांकन पत्र देण्यात येईल. हे गुणांकन पत्र एकूण १०० गुणांचे असेल आणि परीक्षण समितीच्या सदस्यांमार्फत प्रत्येक नाटकास स्वतंत्रपणे गुण देण्यात येतील. परीक्षण समितीच्या सदस्यांमार्फत द्यावयाच्या गुणांकनाचा नमुना खालीलप्रमाणे आहे.

**व्यावसायिक व प्रायोगिक नाटकांचे गुणांकन :-**

| संस्थेचे नाव | नाटकाचे नाव | नाटकाची संहिता / लेखन | वेशभूषा | रंगभूषा | प्रकाश योजना | संगीत | अभिनय | नेपथ्य | दिग्दर्शन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २० गुण | १० गुण | १० गुण | १० गुण | १० गुण | १० गुण | १० गुण | २० गुण | १०० |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

**संगीत नाटकांचे गुणांकन :- (नवीन संहिता असणारे व जुनी संहिता असणारे नाटक)**

| संस्थेचे नाव | नाटकाचे नाव | नाटकाची संहिता / लेखन | वेशभूषा | रंगभूषा | प्रकाश योजना | संगीत | अभिनय व गाणे | नेपथ्य | दिग्दर्शन | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १० गुण | १० गुण | १० गुण | १० गुण | २० गुण | २० गुण | १० गुण | १० गुण | १०० |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

५. सर्व परीक्षण समिती सदस्यांकडून नाटकास देण्यात आलेल्या एकूण गुणांच्या सरासरीचा विचार करुन शासकीय अनुदानाकरिता पात्र होण्याकरिता खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार नाटकांचा दर्जा ठरविण्यात यावा.

| अ.क्र. | गुणांकन | दर्जा | अनुदानासाठी पात्र / अपात्र |
|---|---|---|---|
| १) | ७६ ते १०० गुण प्राप्त नाटक | अ | अनुदानास पात्र |
| २) | ६१ ते ७५ गुण प्राप्त नाटक | ब | अनुदानास पात्र |
| ३) | **६० किंवा त्यापेक्षा कमी गुण प्राप्त नाटक** | | **अपात्र** |

**अपात्र :- ६० किंवा त्यापेक्षा कमी गुण प्राप्त होणारे नाटक शासकीय अनुदानास अपात्र राहील.**

६. परीक्षण समितीने नाटकाचा दर्जा निश्चित केल्यानंतर सदर दर्जा घोषित करणारे पत्र संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचेमार्फत संबंधीत नाटय संस्थेस तात्काळ देण्यात यावे. सदर दर्जा घोषित करणारे पत्र निर्गमित झाल्यानंतर संबंधित नाटय संस्थेने नाटकाचे प्रयोग सादर करुन अनुदानाच्या मागणीचा नवीन प्रस्ताव संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे सादर करावा. सदर प्रस्तावामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावा.

(६.१) नाटय संस्थेने अनुदानासाठी सादर केलेल्या मूळ अर्जाचा दिनांक व क्रमांक

(६.२) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या ज्या पत्रान्वये नाटकाचा दर्जा घोषित केला आहे, त्या पत्राची छायाप्रत जोडावी.

(६.३) संस्थेचे बँक खाते पुस्तकाचे पहिले पृष्ठ व पॅनकार्ड (PAN CARD) यांच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्या.

(६.४) ज्या नवीन नाटकासाठी नाटय संस्थेने अनुदानाची मागणी केली आहे त्या नाट्य प्रयोग झाल्याचे पुरावे खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात यावे.

| प्रयोग क्रमांक | प्रयोगाचा दिनांक | प्रयोगाचे ठिकाण | तिकीटाचा दर | नाटकाच्या जाहिरातीची प्रत | नाटयगृह आरक्षित केल्याच्या पावत्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३.. | | | | | |

७. नाटय संस्थेने नाटक सादर केल्याच्या प्रयोगाचे पुरावे सादर करतांना खालीलप्रमाणे नमूद अटींची पूर्तता करण्यात यावी.

(७.१) नाटकाच्या तिकिटावर दराबाबत रबर स्टॅम्पऐवजी छापील स्वरुपात दराची रक्कम नमूद असावी.

(७.२) नाटकाच्या तिकिट दरात खाडा-खोड नसावी.

(७.३) नाटयगृहाच्या आरक्षित पावतीवर नाटकाच्या नावाचा स्पष्ट उल्लेख असावा.

(७.४) नाटकाच्या जाहिरातीत "महाराष्ट्र शासन अनुदान पात्र नाटक" असे स्पष्ट व ठळक अक्षरात नमूद करावे.

(७.५) ज्या नाटय प्रयोगांना शासन अनुदान देणार आहे, त्या नाटय प्रयोगाच्या तिकीटाचे दर कोणत्याही परिस्थितीत ज्या जिल्ह्यातील नाटक संस्था आहे, त्या ठिकाणी अनुषंगिक कर वगळता कमाल रुपये ३००/- (रुपये तीनशे फक्त) पेक्षा व इतर जिल्ह्यात रुपये ४००/- (रुपये चारशे फक्त) पेक्षा जास्त असू नये.

(७.६) परीक्षण समितीने दिलेल्या "अ" दर्जाच्या नाटकांना एकूण १०० प्रयोगांसाठी अनुदान मिळेल. संबंधीत नाटकाच्या निर्मात्यांनी एकूण चार टप्प्यात अनुदानाची मागणी करावी. (पहिल्या टप्प्यात १०, दुस-या टप्प्यात २५, तिस-या टप्प्यात ४० व चौथ्या टप्प्यात २५ प्रयोग याप्रमाणे). संबंधीत नाटकाचे प्रयोग महाराष्ट्र राज्याच्या बाहेर केलेले असले तरी ते अनुदानासाठी ग्राहय धरण्यात यावे.

(७.७) परीक्षण समितीने दिलेल्या "ब" दर्जाच्या नाटकांना एकूण ७५ कमाल प्रयोगांसाठी अनुदान मिळेल. संबंधीत नाटकाच्या निर्मात्यांनी एकूण तीन टप्प्यात अनुदानाची मागणी करावी. (पहिल्या टप्प्यात १०, दुस-या टप्प्यात २५ आणि तिस-या टप्प्यात ४० प्रयोग याप्रमाणे). संबंधीत नाटकाचे प्रयोग महाराष्ट्र राज्याच्या बाहेर केलेले असले तरी ते अनुदानासाठी ग्राहय धरण्यात यावे.

(७.८) नाटय संस्थेने पहिल्या टप्प्यात १० नाटय प्रयोग केल्याचे पुरावे सादर करीत असतांना महाराष्ट्रातील सहा महसूली विभागांपैकी किमान तीन महसूली विभागात नाटकाचे प्रत्येकी ०२ प्रयोग केल्याचे पुरावे सोबत जोडणे आवश्यक आहे.

(७.९) उपरोक्त नमूद केलेल्या संख्येनुसार उर्वरित टप्प्यातील नाटय प्रयोग केल्याचे पुरावे सादर करतांना महाराष्ट्रातील किमान चार महसूली विभागांमध्ये प्रत्येकी ०२ प्रयोग प्रती महसूली विभाग याप्रमाणे नाटक सादर केल्याचे पुरावे सोबत जोडणे आवश्यक आहे.

(७.१०) जर एखाद्या संस्थेने १० नाटय प्रयोगांऐवजी ३५ नाटय प्रयोगानंतर किंवा ७५ नाटय प्रयोगांनंतर किंवा १०० नाटय प्रयोगांनंतर एकत्रितरित्या एकाचवेळी अनुदान मिळण्याकरिता मागणी अर्ज केला, तरी तो स्विकारण्यात यावा. मात्र त्याप्रसंगी महसूली विभागात उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे नाटय प्रयोग करणे नाटय संस्थांना बंधनकारक राहील.

(७.११) नाटकास अनुदान मिळण्यासाठी केलेल्या अर्जासोबतची तसेच नाटकाचे सादरीकरण (प्रयोग) केल्याच्या पुराव्यासोबतची कागदपत्रे खोटी आढळून आल्यास आणि त्याद्वारे केवळ शासनाचे अनुदान प्राप्त
करण्याकरिता शासनाची दिशाभूल केल्याचे आढळून आल्यास, संबंधित नाटय संस्थेस "या" योजनेतून अनुदान देण्यासाठी कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल. भविष्य काळात संबंधित संस्थेस शासनाच्या नाटय स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठीही कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

८. या योजनेअंतर्गत खालीप्रमाणे नमूद अनुदान देण्यात येईल.

| अ.क्र. | नाटकाचा प्रकार | नाटकाचा दर्जा | कमाल प्रयोग संख्या | प्रति प्रयोग अनुदान (रुपये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| १ | व्यावसायिक नाटक | अ | १०० | २५,००० |
| | | ब | ७५ | २०,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | संगीत नाटक (नवीन संहिता असणारे) | अ | १०० | ३०,००० |
| | | ब | ७५ | २५,००० |
| ३ | संगीत नाटक (जुनी संहिता असणारे) | अ | १०० | २५,००० |
| | | ब | ७५ | २०,००० |

९. नाटक अनुदानास पात्र झाल्याच्या संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या पत्राच्या दिनांकापासून एक वर्षाकरिता सदर नाटक अनुदानास पात्र असेल.

**ब) <u>प्रायोगिक नाटय निर्मिती अनुदानासाठीची कार्यपध्दती :</u>**

१. प्रायोगिक नाटके व्यावसायिक दृष्टीकोनातून सादर करण्यात येत नसल्यामुळे अशा प्रायोगिक नाटकांच्या अनुदानासाठी वेगळी पध्दत अनुसरण्यात येत आहे. एखादी नाटयकृती व्यावसायिक आहे की प्रायोगिक हे नाटयकृती पाहून ठरविता येईल. एखाद्या व्यावसायिक संस्थेने नाटय प्रयोगासाठी शासकीय अनुदानाकरिता अर्ज केल्यानंतर तो नाटय प्रयोग व्यावसायिक आहे की प्रायोगिक हे परीक्षण समिती नाटय प्रयोग पाहून ठरविल व त्याप्रमाणे निर्णय घेईल.

२. प्रायोगिक नाटकाचे सादरीकरण किमान १०० मिनिटे ते कमाल १८० मिनिटांचे असावे. प्रायोगिक नाटकाची संहिता नवीन असणे तसेच सादरीकरणामध्ये वेगळेपणा असणे आवश्यक आहे. या प्रायोगिक नाटकाचे किमान तीन प्रयोग झालेले असावेत. संबंधीत आर्थिक वर्षात जास्तीत जास्त दोन नाटकांसाठी नाटय संस्थेस प्रस्ताव सादर करता येईल.

३. परीक्षण समितीने नाटकाचा दर्जा ठरविल्यानंतर त्याबाबतचा दर्जा घोषित करणारे पत्र संबंधित संस्थेस संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत तात्काळ देण्यात येईल. सदर दर्जा घोषित करणारे पत्र निर्गमित झाल्यानंतर संबधित नाटय संस्थेने नाटकाचे प्रयोग सादर करुन अनुदान मागणीचा नवीन प्रस्ताव संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे सादर करावा. प्रायोगिक नाट्य निर्मिती अनुदानाची मागणी करतांना प्रस्तावात खालील बाबींचा समावेश असावा.

(३.१) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांनी ज्या पत्राद्वारे नाटकाचा दर्जा घोषित केला आहे, त्या पत्राची छायाप्रत जोडावी.

(३.२) संस्थेच्या बँक खात्ये पुस्तकाच्या पहिल्या पृष्ठाची छायाप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

(३.३) ज्या नवीन नाटकासाठी अनुदान मागितले आहे त्या नाटकाचे प्रयोग झाल्याचे पुरावे संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार सादर करण्यात यावे.

| प्रयोग क्रमांक | प्रयोगाचा दिनांक | प्रयोगाचे ठिकाण | तिकीटाचा दर | नाटकाच्या जाहिरातीची प्रत | नाटयगृह आरक्षित केल्याच्या पावत्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

४. नाटय निर्मिती संस्थांनी नाटय प्रयोगाचे पुरावे सादर करतांना खालील नमूद अटींची पूर्तता करण्यात यावी.

(४.१) तिकिटावर दराबाबत रबर स्टॅम्पऐवजी छापील स्वरुपात दराची रक्कम नमूद असावी.

(४.२) तिकिट दरात खाडा-खोड नसावी.

(४.३) नाटयगृहाच्या आरक्षित पावतीवर नाटकाच्या नावाचा स्पष्ट उल्लेख असावा.

(४.४) जाहिरातीत "महाराष्ट्र शासन अनुदान पात्र नाटक" असे स्पष्ट व ठळक अक्षरात नमूद करावे.

(४.५) ज्या नाटय प्रयोगांना शासन अनुदान देणार आहे, त्या नाटय प्रयोगाच्या तिकीटाचे दर कोणत्याही परिस्थितीत अनुषंगिक कर वगळता रुपये २००/- (रुपये दोनशे फक्त) पेक्षा जास्त असू नयेत.

(४.६) "अ" दर्जाच्या नाटकांना कमाल ५० प्रयोगांसाठी अनुदान मिळेल. संबंधीत नाटय निर्मात्यांनी पाच टप्प्यात अनुदानाची मागणी करावी. (पहिल्या टप्प्यात ०५ प्रयोगानंतर, दुस-या टप्प्यात १० प्रयोगानंतर, तिस-या टप्प्यात १० प्रयोगानंतर, चौथ्या टप्प्यात १० प्रयोगानंतर आणि पाचव्या टप्प्यात १५ प्रयोगानंतर, याप्रमाणे पाच टप्प्यात). सदर प्रयोग महाराष्ट्र राज्याबाहेर केलेले असले तरी ते अनुदानासाठी ग्राहय धरण्यात येतील.

(४.७) "ब" दर्जाच्या नाटकांना ३० कमाल प्रयोगांसाठी अनुदान मिळेल. संबंधीत नाटय निर्मात्यांनी तीन टप्प्यात अनुदानाची मागणी करावी. (पहिल्या टप्प्यात ०५, दुस-या टप्प्यात १० व तिस-या टप्प्यात १५ याप्रमाणे तीन टप्प्यात ) सदर प्रयोग महाराष्ट्र राज्याबाहेर केलेले असले तरी ते अनुदानासाठी ग्राहय धरण्यात येतील.

(४.८) पहिल्या टप्प्यात ०५ नाटयप्रयोग केल्याचे पुरावे सादर करतांना महाराष्ट्रातील सहा महसूली विभागांपैकी किमान दोन महसूली विभागात एक प्रयोग प्रती महसूली विभाग याप्रमाणे नाटक सादर केल्याचे पुरावे सोबत जोडणे आवश्यक आहे.

(४.९) पुढील सर्व टप्प्यातील विहित नाटय प्रयोग केल्याचे पुरावे सादर करीत असताना महाराष्ट्रातील सर्व ६ महसुली विभांगापैकी किमान २ महसूल विभागांमध्ये एक प्रयोग प्रती महसूली विभाग याप्रमाणे नाटक सादर केल्याचे पुरावे सोबत जोडणे आवश्यक आहे.

(४.१०) नाटकास अनुदान मिळण्यासाठी केलेल्या अर्जासोबतची तसेच नाटकाचे सादरीकरण (प्रयोग) केल्याच्या पुराव्यासोबतची कागदपत्रे खोटी आढळून आल्यास आणि त्याद्वारे केवळ शासनाचे अनुदान प्राप्त करण्याकरिता शासनाची दिशाभूल केल्याचे आढळून आल्यास, संबंधित नाटय संस्थेस "या" योजनेतून अनुदान देण्यासाठी कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल. भविष्य काळात संबंधित संस्थेस शासनाच्या नाटय स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठीही कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

५. या योजनेअंतर्गत प्रायोगिक नाटय निर्मिती संस्थांना खालीलप्रमाणे नमूद अनुदान देण्यात यावे.

| अ. क्र. | नाटकाचा प्रकार | नाटकाचा दर्जा | कमाल प्रयोग संख्या | प्रती प्रयोग अनुदान (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | प्रायोगिक नाटक | अ | ५० | १५,००० |
| | | ब | ३० | १०,००० |

६.	नाटक अनुदानास पात्र झाल्याच्या संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या पत्राच्या दिनांकापासून एक वर्षाकरिता सदर नाटक अनुदानास पात्र असेल.

७.	या शासन निर्णयामधील "अ" आणि "ब" येथे नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार नाटय निर्मिती संस्थांना व्यावसायिक (नवीन), संगीत (नवीन संहिता असणारे व जुनी संहिता असणारे नाटक) आणि प्रायोगिक (नवीन) नाटकांच्या नाट्य निर्मितीसाठी अनुदान, या योजनेअंतर्गत शासनामार्फत देण्यात येणारे अनुदान हे त्या त्या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेत देण्यात येईल.

८.	नाट्यनिर्मिती संस्थांना, व्यावसायिक (नवीन), संगीत (नवीन संहिता असणारे व जुनी संहिता असणारे नाटक) आणि प्रायोगिक (नवीन) नाटकांच्या नाट्य निर्मितीसाठी अनुदान, या योजनेची अंमलबजावणी करतांना अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार शासनास राहील व शासनाने घेतलेला निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

९.	नाट्य निर्मिती संस्थांना, व्यावसायिक (नवीन), संगीत (नवीन संहिता असणारे व जुनी संहिता असणारे नाटक) आणि प्रायोगिक (नवीन) नाटकांच्या नाट्य निर्मितीसाठी अनुदान, या योजनेकरिता संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास यासंबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

१०.	नाट्य निर्मिती संस्थांना, व्यावसायिक (नवीन), संगीत (नवीन संहिता असणारे व जुनी संहिता असणारे नाटक) आणि प्रायोगिक (नवीन), नाटकांच्या नाट्य निर्मितीसाठी अनुदान, या योजनेवर होणारा खर्च मागणी क्र.झेड डी-२, २२०५, कला व सांस्कृतिक संस्था, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना- कला व सांस्कृतिक संस्था - (०५) कला व सांस्कृतिक संस्थांना सहाय्यक अनुदान (०५) (०१) कला व सांस्कृतिक कार्य संस्थांना सहाय्यक अनुदान (२२०५ १६२३) ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर), या लेखाशीर्षाखालील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

११.	हा शासन निर्णय नियोजन विभाग यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९३ / १४४३ दि. २५.०७.२०१९ आणि वित्त विभाग यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३१९/२०१९/व्यय.१५, दि.२३.८.२०१९ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०९१६१८०२३८२५२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(विलास रा. थोरात)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव